# SPANDAN CAREER INSTITUTE

THE WAY OF SUCCESS…

**B**

**प्रश्नपुस्तिका क्र.**

**BOOKLET No.** **HI2020**

**Total Que. : 100**
**Marks : 200**
**Time : 120 min**

**Mob. No. 9923262977**

**Date : 07/12/2019**

**राज्यसेवा (पूर्व) सराव परिक्षा - 2020**


**पेपर क्र. (२)**

**विषय : — इतिहास (History) [022]**

**सूचना**

१. सदर प्रश्नपुस्तिकेत १०० अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरूवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका पयवेक्षकाकडून लगेच बदलून घ्यावी.

२. आपला परीक्षा—क्रमांक हया चौकोनांत न विसरता बॉलपेनने लिहावा.




३. वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे न विसरता नमूद करावा.

४. अ) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला ४ पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना १,२,३ आणि ४ असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवर सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करतांना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी.

५. सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. अशा प्रकारे प्रश्न सोडविणे सोयीस्कर आहे; पण एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे. अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नाकडे परतणे सोईस्कर ठरेल.

६. उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

७. प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरापैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या **प्रत्येक चुकीच्या उत्तरांसाठी एक तृतीयांश गुण वजा करण्यात येतील**.''

**Head Office : 1st Floor, Vidarbha Hindi Sahitya Sammelan, Jhansi Rani Sq. Sitabuldi, Nagpur-12.**

**Note : Test Series Paper Online available**

**Visit us**

www.spandancareers.org

१. सन १९४७ मध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने फाळणी मान्य करण्याचे प्रमुख कारण काय होते?
(१) त्यावेळी काँग्रेसला द्विराष्ट्र सिद्धांत मान्य होता.
(२) ब्रिटीश सरकारने फाळणी लादली होती आणि ती स्विकारण्यावाचून काँग्रेसला दुसरा पर्याय नव्हता.
(३) मोठया प्रमाणावरील सांप्रदायिक दंगली टाळणे
(४) फाळणी स्विकारली नसती तर भारताने स्वातंत्र्य मिळवण्याची संधी गमावली असती.

---

२. खालीलपैकी कोणते विधान भारतीय स्वातंत्र्यलढयाच्या सुरवातीच्या काळातील जहालांची विचारसरणी स्पष्ट करते?
(१) आयात केलेल्या वस्तुंपेक्षा भारतीय वस्तुंना पसंती देऊन त्यांच्या उत्पादनवाढीस चालना देणे.
(२) अर्ज विनंत्या अथवा घटनात्मक मार्गापेक्षा आक्रमक साधनांचा वापर करून स्वराज्य मिळवणे.
(३) देशाच्या गरजेनूसार राष्ट्रीय समर्पणाचा वापर करणे.
(४) ब्रिटीश साम्राज्याला उलथून पाडण्यासाठी लष्करी उठाव करणे.

---

३. लखनौ करारातील मुद्यांबाबत खालील विधाने विचारात घ्या व ***योग्य*** विधाने निवडा.
अ. केंद्रीय मंत्रिमंडळातील एक तृतीयांश निर्वाचीत जागा मुस्लिमासाठी आरक्षीत असतील, ज्या स्वतंत्र मतदार संघातुन भरल्या जातील.
ब. भारतास 'साम्राज्यांतर्गत स्वशासीत देशाचा' (Dominon Status) दर्जा असेल.
क. काँग्रेसने १९०९ च्या कायद्यातील मुस्लिमांसाठी स्वतंत्र मतदारसंघाची तरतूद मान्य केली.
(१) केवळ अ योग्य
(२) केवळ अ व क योग्य
(३) केवळ ब व क योग्य
(४) वरीलपैकी सर्व योग्य

---

४. ***चुकीचे*** विधान ओळखा.
(१) वि.दा. सावरकरांनी पतित पावन मंदिर रत्नागिरी येथे बांधले.
(२) म. फुले यांनी शिवाजी महाराजांच्या समाधीचा जीर्णोद्धार केला.
(३) ब्राम्हणेतरांतून पुरोहित तयार करण्यासाठी शाहूंनी शाळा काढली.
(४) पंडिता रमाबाईंनी पुण्यात सेवासदन संस्था काढली.

---

५. खालील विधाने विचारात घ्या.
अ. १९२० साली कलकत्ता येथे मौलाना अब्दुल कलाम आझाद यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या खिलाफत परिषदेमध्ये असहकाराचा ठराव पारित करण्यात आला.
ब. १९२० साली मौलाना अब्दुल कलाम आझाद यांनी पॅरीस येथे शांतता चर्चेमध्ये खिलाफत चळवळीच्या मागण्या मांडल्या.
क. रौलेट कायदा रद्द करून 'पंजाब अन्यायाची' उपाय योजना करण्याची मागणी ही असहकार चळवळीच्या काही प्रमुख मागण्यापैकी होती.
(१) केवळ क योग्य
(२) केवळ अ व क योग्य
(३) केवळ ब व क योग्य
(४) वरीलपैकी सर्व योग्य

---

६. खाली देण्यात आलेले महत्त्वाचे गव्हर्नर–जनरल आणि त्यांनी केलेली कामे यांच्या ***योग्य*** जोडया जुळवा.

| | |
|---|---|
| अ. लॉर्ड डलहौसी | १. गुलामगिरीची पद्धत रद्द केली. |
| ब. लॉर्ड कर्झन | २. सार्वजनिक बांधकाम खाते निर्मिती |
| क. लॉर्ड कॉर्नवॉलिस | ३. वायव्य सरहद्द प्रांताची निर्मिती |
| ड. लॉर्ड एलनबरो | ४. 'दरोगा' हे हिंदूस्थानी अधिकारी नेमले. |

**अ ब क ड**
(१) ४ ३ २ १
(२) २ ३ ४ १
(३) १ २ ३ ४
(४) ३ ४ १ २

---

www.spandancareers.org

७. महालवारी पद्धती विषयी ***योग्य*** विधाने निवडा.

अ. हि पद्धती उत्तरप्रदेशचा बहुतांश भाग, मध्यभारत क्षेत्र, पंजाब येथे लागु झाली.

ब. जवळ–जवळ ५१ टक्के भाग या पद्धतीने प्रभावित झाला.

क. भूमी कराच्या बाबतीत ग्रामाची संयुक्त जबाबदारी होती.

ड. हया पद्धतीतील कराचे प्रमाण १० ते ४० वर्षासाठी होते.

(१) सर्व योग्य (२) अ, क व ड योग्य

(३) अ, ब व ड योग्य (४) ब, क व ड योग्य

---

८. काँग्रेसची स्थापना ब्रिटीश साम्राज्याची 'सुरक्षा झडप' (Safety value) म्हणुन झाली असावी असे मत खालीलपैकी कोणी व्यक्त केले होते?

(१) ॲलन हयुम (२) लोकमान्य टिळक

(३) लाला लजपतराय (४) महात्मा गांधी

---

९. खाली दिलेल्या विवरणावरून व्यक्ती ओळखा.

अ. हा मुंबईचा गव्हर्नर होता.

ब. हा शिक्षणप्रसाराचा भोक्ता होता.

क. 'ब्रिटीश साम्राज्याचे जाळे मुत्सद्दीपणे महाराष्ट्रभर फेकणारा' असे त्याचे वर्णन केले जाते.

ड. त्याने खास अनुदान देऊन 'पुना संस्कृत कॉलेज' च्या स्थापनेस हातभार लावला.

(१) सर जेम्स ग्रँट (२) सर एलिफन्स्टन (३) सर थॉमस मन्रो (४) सर ग्रँट डफ

---

१०. खालीलपैकी कोणाला ब्रिटीश भारत इतिहासातील 'वृत्तपत्राचे मुक्तीदाते' (Liberators of the press) असे संबोधले जाते?

(१) चार्ल्स मेटाकाल्फ, सर जॉन ॲडम्स

(२) चार्ल्स मेटकाल्फ, लॉर्ड मेकॉले

(३) चार्ल्स मेटकाल्फ, लॉर्ड लिटन

(४) लॉर्ड मेकॉले, सर जॉन ॲडम्स

---

११. विधाने विचारात घ्या.

अ. लॉर्ड कॅनिंगच्या काळात आलेला १८५४ चा वुडचा खलिता (Woods dispatch) हा भारतातील शिक्षणाच्या विकासाला वळण देणारा ठरला.

ब. सर चार्ल्स वूड हे ब्रिटीश मंत्रिमंडळात बोर्ड ऑफ कंट्रोलचे (Board of Control) अध्यक्ष होते.

क. मेकॉलेच्या 'झिरपत्या सिद्धांताची (Infiltration theory) व्यवस्था रद्द करण्याची तरतुद वूडच्या खलित्यात करण्यात आली.

ड. मुंबई विद्यापीठाची स्थापना करण्याची शिफारस वुडच्या खलित्यामध्ये करण्यात आली होती.

वरील दिलेले अयोग्य ***नसलेले विधान*** ओळखा

(१) वरीलपैकी सर्व (२) केवळ अ, ब, क (३) केवळ ब, क, ड (४) केवळ अ, क, ड

---

१२. पहीले कर्नाटक युद्ध बद्दल खालील विधाने विचारात घ्या.

अ. युरोपात इंग्लंड व फ्रान्स यांच्या दरम्यान 'ऑस्ट्रीयन वारसा हक्कांचे युद्ध सुरू झाल्यामुळे भारतातही इंग्रज व फ्रेंच यांच्यात युद्ध सुरू झाले.

ब. या युद्धादरम्यान फ्रेंच गवर्नर डुप्ले याने इंग्रजांच्या ताब्यातील मद्रास जिंकुन घेतले होते.

क. या युद्धादरम्यान कर्नाटकचा नवाब अन्वरूद्दीन व फ्रेंच यांच्यामध्ये प्रसिद्ध अशी सेंट थोमची लढाई झाली.

ड. युरोपात पॅरीसचा तह होऊन तेथील युद्ध थांबल्यानंतर भारतातील पहिले कर्नाटक युद्ध थांबले.

(१) केवळ अ, ब व क योग्य

(२) केवळ ब, क व ड योग्य

(३) केवळ अ, ब व ड योग्य

(४) केवळ अ, क व ड योग्य

---

www.spandancareers.org

१३. भारतातील सर्वात मोठे कालव्याचे जाळे (Network of Canals) तयार करणारा दिल्लीचा सुलतान कोण होता?

(१) अल्तमश (२) गियासुद्दीन तुघलक

(३) अल्लाउद्दीन खिलजी (४) फिरोजशाहा तुघलक

---

१४. विजयनगर साम्राज्यात चार वंश होऊन गेले. त्यांचा खाली दिलेल्या पर्यायापैकी योग्य कालानुक्रम असलेला पर्याय कोणता आहे?

अ.संगम वंश ब. अरबिंदू वंश क. तुलुवा वंश ड. सालवु वंश

(१) अ—ब—क—ड (२) अ—ड—क—ब (३) अ—क—ड—ब (४) अ—क—ब—ड

---

१५. खालीलपैकी कोणत्या मुघलशासकाची कारकीर्द ही मुघल चित्रकलेसाठी अभिजात युग (Golden Age) म्हणुन ओळखली जाते?

(१) बाबर (२) हुमायुन (३) जहांगिर (४) औरंगजेब

---

१६. ***योग्य*** जोडया लावा:

| **साहित्यीक** | **साहित्य** |
|---|---|
| अ. शुद्रक | १. पंचसिद्धांतीक |
| ब. कालीदास | २. देवी चंद्रगुप्त |
| क. विशाखादत्त | ३. मृच्छकटीक |
| ड. वराहमिहीर | ४. ऋतुसंहार |

**अ ब क ड**

(१) ३ ४ २ १

(२) ३ १ ४ २

(३) ३ २ १ ४

(४) ३ २ ४ १

---

१७. मध्ययुगीन भारतातील कोणत्या परकीय प्रवाशाने तत्कालीन भारतीय उपखंडातील सामाजिक व सांस्कृतिक बाबींवर 'रिहला' नावाच्या ग्रंथाची रचना केली आहे

(१) अल्—बिरूनी (२) इब्न बतुता (३) फ्रँकोइस बर्निअर (४) हुएनत्संग

---

१८. खालील विधाने लक्षात घ्या:

प्रतिपादन (A) :— अशोकाने कलिंगाचे राज्य मौर्य साम्राज्यास जोडले.

कारण (R) :— दक्षिण भारताकडे जाणारे सर्व खुष्कीचे व समुद्री मार्ग यांच्यावर कलींगाचे नियंत्रण होते.

(१) (A) व (R) दोन्ही बरोबर आहेत आणि (R) हे (A) चे योग्य स्पष्टीकरण आहे.

(२) (A) व (R) दोन्ही बरोबर आहेत परंतु (R) हे (A) चे योग्य स्पष्टीकरण नाही.

(३) (A) बरोबर आहे, (R) बरोबर नाही.

(४) (A) बरोबर नाही, (R) बरोबर आहे.

---

१९. लॉर्ड वेलस्लीने केलेल्या तैनाती फौजेच्या तहानुसार खालील राज्याचा ***योग्य*** कालानुक्रम लावा.

अ. अवध ब. नागपूर क. म्हैसूर ड. हैदराबाद इ. तंजावर

(१) अ, ड, इ, ब, क (२) ड, क, इ, अ, ब (३) ड, क, इ, ब, अ (४) ड, ब, क, अ, इ

---

२०. सविनय कायदेभंगाच्या चळवळीमध्ये खालीलपैकी कोणते कार्यक्रम समाविष्ट होते?

अ. मिठाचा सत्याग्रह

ब. शासकीय शिक्षण संस्थांवर बहिष्कार

क. परदेशी मालांवर बहिष्कार

ड. जंगल कायद्याचा भंग करणे

(१) फक्त अ, ब (२) फक्त ब, क, ड (३) फक्त अ, ब, क (४) अ, ब, क, ड

---

www.spandancareers.org

२१. खाली देण्यात आलेली महाराष्ट्रातील वृत्तपत्रे आणि संस्थापक यांच्या ***योग्य*** जोडया जुळवा.

| **वृत्तपत्र** | **संस्थापक** |
|---|---|
| अ. नवाकाळ | १. के. पी. मेहेंदळे |
| ब. राष्ट्रमत | २. एल. एन. जोशी |
| क. गुराखी | ३. एस के. दामले |
| ड. मुंबई वैभव | ४. के.पी. खाडिलकर |

**अ ब क ड**

(१) ४ ३ २ १

(२) २ ४ १ ३

(३) ३ १ ४ २

(४) १ २ ३ ४

---

२२. दिनशॉ वाच्छा यांनी खालीलपैकी कोणास 'महाराष्ट्राचे सॉक्रेटिस' असे म्हटले?

(१) न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे (२) गोपाळकृष्ण गोखले

(३) महर्षी विठ्ठल रामजी शिंदे (४) लोकमान्य टिळक

---

२३. 'नेहरू अहवाल' (Nehru Report) बाबत खालीलपैकी काय ***खरे नाही***?

(१) नागरिकांच्या मूलभूत हक्कांची सनद या अहवालात समाविष्ट होती.

(२) भारतात संघराज्याची स्थापना करण्यात यावी आणि प्रांतांना स्वायत्तता बहाल करण्यात यावी.

(३) ब्रिटिश साम्राज्याकडून भारताला तत्काळ पूर्ण स्वराज्य देण्यात यावे.

(४) या अहवालाला प्रत्युत्तर म्हणून जीनांनी चौदा सूत्री कार्यक्रम सांगितला.

---

२४. डिसेंबर १८८७ मध्ये पंडिता रमाबाई यांनी कोणत्या ठिकाणी 'रमाबाई असोसिएशन' या संस्थेची स्थापना केली?

(१) केडगाव (२) बोस्टन (३) सॅन फ्रान्सिस्को (४) लंडन

---

२५. हैदराबाद संस्थानात 'इत्तेहादूल मुसलमीन' या संघटनेने हिंदूवर करत असलेल्या अत्याचाराच्या विरोधात खालीलपैकी कोणी १९२७ ला गुंजोटी येथे 'हिंदू संघटना' स्थापना केली?

(१) श्रीनिवास शाईवाले (२) वि.रा. पाटिल (३) दिगंबरराव बिंदू (४) नारायण पवार

---

२६. खाली देण्यात आलेले महत्त्वाचे ब्रिटिश कायदे व त्यातील प्रमुख तरतुदी यांच्या ***योग्य*** जोडया जुळवा.

| | |
|---|---|
| अ. १७७३ चा रेग्युलेटिंग ॲक्ट | १. भारतासाठी 'हायकमिशनर' पद निर्माण |
| ब. १७८४ चा पिट्स इंडिया ॲक्ट | २. इंग्लंडमध्ये भारतासाठी 'भारतीय राज्य सचिव'(Secretary of State for India) |
| क. १८५८ चा भारत सरकार अधिनियम | ३. चार सदस्यीय 'कार्यकारी परिषदे'ची तरतूद |
| ड. १९१९ चा माँटफोर्ड कायदा | ४. 'बोर्ड ऑफ कंट्रोल' ची स्थापना |

**अ ब क ड**

(१) ४ ३ २ १

(२) ३ ४ २ १

(३) ३ ४ १ २

(४) ४ ३ १ २

---

२७. अजातशत्रुबद्दल पुढीलपैकी कोणती विधाने ***बरोबर*** आहेत?

अ. त्याचे नाव कुणीकपण होते,

ब. तो हर्यक घराण्याचा शेवटचा राजा होय.

क. त्याच्या शासनकाळात राजगृह येथे प्रथम बौद्ध परिषद आयोजित केली होती.

ड. त्याने लिच्छवी राज्याला मगधमध्ये विलीन केले.

(१) अ व ब (२) फक्त अ (३) ब, क, ड (४) वरीलपैकी सर्व

---

www.spandancareers.org

२८. गव्हर्नर–जनरल–इन कौन्सिलचा सभासद असलेल्या खालीलपैकी कोणी १८४३ ला इंग्रजी माध्यमाची पहिली शाळा कलकत्ताला सुरू केली?

(१) लॉर्ड वेलस्ली (२) लॉर्ड मेकॉले (३) लॉर्ड विल्यम बेंटिक (४) विल्यम कॅरी

२९. 'भारतीय इतिहासातील वैदिक काळ हा अंधारयुग तर बौद्ध काळ हा सुवर्णयुग' हे मत कोणाचे?

(१) डॉ. बी. आर. आंबेडकर (२) वि. रा. शिंदे (३) डी. डी. कोसंबी (४) म. फुले

३०. खालीलपैकी संस्थानिकांनी भारतीय संघराज्यात सामील होण्यास विरोध दर्शविला होता मात्र ते नंतर समाविष्ट झाले, त्यांच्या सामीलतेनुसार ***योग्य*** कालानुक्रम लावा.

अ. काश्मिर ब. जुनागड क. हैद्राबाद

(१) अ,ब,क (२) ब,क,अ (३) क,ब,अ (४) अ,क,ब

३१. ***योग्य*** विधान/ने ओळखा.

अ. महाराष्ट्रात वृत्तपत्राचा प्रारंभ १७८९ मध्ये 'बॉम्बे गॅझेट' या साप्ताहिकाने झाला.

ब. भारतीय भाषेतून प्रकाशित होणारे पहिले वृत्तपत्र 'मुंबई समाचार' आहे.

(१) फक्त अ (२) फक्त ब (३) दोन्ही अ, ब (४) यापैकी नाही

३२. ***योग्य*** जोडया जुळवा.

| **कामगार संघटना** | **स्थापना** |
|---|---|
| अ. बॉम्बे मिल ओनर्स असोसिएशन | १. १८७५ |
| ब. बॉम्बे मिल हँड असोसिएशन | २. १८८४ |
| क. कामगार हितवर्धक सभा | ३. १९१० |
| ड. ऑल इंडिया ट्रेड युनियन | ४. १९२० |

**अ ब क ड**

(१) १ २ ३ ४

(२) ३ २ १ ४

(३) २ ३ ४ १

(४) १ ४ ३ २

३३. ॲनी बेझंट यांनी खालीलपैकी कोणता/ते ग्रंथ लिहिलेले नाही/नाहीत?

अ. इंडिया ए नेशन

ब. इन डिफेन्स ऑफ हिंदूइजम

क. हाऊ इंडिया ब्रॉट अस फ्रिडम

ड. इंडिया विन्स फ्रिडम

इ. सिव्हिल अँड रिलिजीएस लिबर्टी

(१) फक्त ब, क (२) फक्त ड (३) फक्त ड, इ (४) फक्त इ

३४. बंगालच्या फाळणीबाबत खालीलपैकी काय ***खरे नाही***?

(१) बंगालच्या फाळणीची मूळ कल्पना विल्यम वॉर्ड यांची होती.

(२) १६ ऑक्टोबर १९०५ या दिवशी बंगालच्या फाळणीची अंमलबजावणी करण्यात आली.

(३) बंगालच्या फाळणीस विरोध करणाऱ्यांमध्ये हेन्री कॉटन हा ब्रिटिश देखील सामील होता.

(४) ज्यावेळी बंगालची फाळणी रद्द केली त्या वेळी लॉर्ड हेस्टिंग्ज हे भारताचे व्हॉईसरॉय होते.

३५. खालीलपैकी कोणत्या व्यक्ती या सम्राट अकबराच्या दरबारी असणाऱ्या नवरत्नांपैकी आहेत?

अ. राजा तोडरमल ब. तानसेन क. मुल्ला दो प्याजा

ड. अबुल फजल इ. महेशदास ई. हकीम खाँ हुमाम

(१) ड सोडून सर्व (२) इ सोडून सर्व (३) ड व इ सोडून सर्व (४) वरील सर्व

www.spandancareers.org

३६. ***योग्य*** जोडया जुळवा.

| | |
|---|---|
| अ. ब्राम्हो समाज | १. राजा राममोहन रॉय |
| ब. आदी ब्राम्हो समाज | २. केशवचंद्र सेन |
| क. नवविधान ब्राम्हो समाज | ३. आनंदमोहन बोस |
| ड. साधारण ब्राम्हो समाज | ४. देवेंद्रनाथ टागोर |

**अ ब क ड**

(१) १ २ ३ ४

(२) १ ३ ४ २

(३) १ ४ २ ३

(४) १ ३ २ ४

---

३७. पुढील वर्णन कोणत्या सनदी कायदा/ चार्टर ॲक्टबाबत केलेले आहे ते ओळखा.

अ. १७७३ च्या कायद्याने सुरू केलेली 'केंद्रीकरणाची प्रक्रिया' या कायद्याने पूर्ण झाली.

ब. या कायद्याने बंगालच्या गव्हर्नर—जनरलला 'भारताचा गव्हर्नर—जनरल' बनविण्यात आले.

क. या कायद्यान्वये गव्हर्नर—जनरलला भारतातील गुलामांच्या स्थितीमध्ये सुधारणा करण्यासाठी तसेच गुलामगिरीची प्रथा संपुष्टात आणण्यासाठी उपाययोजना करण्यास सांगितले होते.

ड. या कायद्यान्वये 'आग्रा प्रेसिडेन्सी' ही एक प्रेसिडेन्सी नव्याने निर्माण करण्यात आली.

(१) चार्टर ॲक्ट — १७९३

(२) चार्टर ॲक्ट— १८१३

(३) चार्टर ॲक्ट—१८३३

(४) चॉर्टर ॲक्ट — १८५३

---

३८. १८५७ च्या उठावाबद्दल माहिती देणारे प्रसिद्ध पुस्तक '१८५७— द ग्रेट रिबेलीयन' (1857- The Great Rebellion) खालीलपैकी कोणी लिहिलेले आहे?

(१) एस.एन.सेन (२) आर.सी.मुजुमदार (३) अशोक मेहता (४) सर सय्यद अहमद खान

---

३९. ''भारताचा नेपोलियन'' म्हणून प्रसिद्ध असलेला 'समुद्रगुप्त' ............. वादनात कुशल होता.

(१) तबला (२) सुतार (३) वीणा (४) मृदंग

---

४०. खालीलपैकी कोणते गांधार कलाशैलीचे वैशिष्टये आहेत?

अ. गांधार शिल्पशैली ही तक्षशिलेच्या आसपासच्या प्रदेशात विकसित झाली.

ब. गौतमबुद्धाच्या अनेक प्रतिमा गांधार शिल्पशैलीत झालेल्या आहेत.

क. बांधेसूदपणा, वास्तवता व दगडातील नाजूक कोरीव काम.

ड. ही कलाशैली आताच्या वायव्य पाकिस्तान व पूर्व अफगाणिस्तानमध्ये विकसित झाली.

(१) वरीलपैकी सर्व योग्य (२) केवळ अ, ब (३) अ, ब, क (४) ब, क, ड

---

४१. मगध हे सर्व महाजनपदामधील सर्वात शक्तिशाली राज्य होते. कारण.......

अ. लोखंडाच्या समृद्ध खाणी राजगीरच्या जवळ होत्या.

ब. राजधानी राजगीरभोवती पाच टेकडया होत्या.

क. पाटलीपुत्र हा जलदुर्ग होता.

(१) फक्त अ (२) अ, ब (३) अ, क (४) अ, ब, क

---

४२. सतवाहनांबाबतचे ***अयोग्य*** विधान निवडा.

(१) ब्राम्हणांना जमिनीचे दान देणारे ते पहिले राज्यकर्ते होते

(२) त्यांच्या काळात जिल्ह्याला अहर म्हणत.

(३) सातवाहन राजा हल याने गाथासप्तशती संस्कृत भाषेमध्ये रचले.

(४) सातवाहनांचे कोरीव लेख प्राकृत भाषेत व ब्राम्ही लिपीत कोरले आहेत.

---

www.spandancareers.org

४३. ***योग्य*** विधाने निवडा.

अ. महंमद कुली कुतुबशहाने हैदराबाद हे शहर वसवले.

ब. त्याने किताब–ए–नौरस हा ग्रंथ रचला.

क. तो स्वत:कवी होता.

(१) फक्त अ (२) फक्त ब (३) अ आणि क (४) वरीलपैकी सर्व

---

४४. आर्य समाजाविषयी पुढील विधाने विचारात घ्या.

अ. त्यांच्या मते वेद अपौरूषेय नाहीत.

ब. या समाजाने शुद्धीकरण चळवळ चालवली.

क. या समाजाने शैक्षणिक संस्था चालवल्या.

ड. त्यांनी कोल्हापूर येथे उच्च शिक्षणासाठी महाविद्यालय सुरू केले.

***योग्य*** विधाने निवडा.

(१) ब, क, ड (२) अ, ब, ड (३) क, ड (४) अ, ब, क, ड

---

४५. पुढीलपैकी कोणत्या बौद्ध धर्मग्रंथामध्ये संघातील भिक्खू व भिक्खुनी यांनी दैनंदिन जीवनात कसे वागावे याचे नियम दिले आहेत?

अ. सुत्तपीटक ब. विनयपीटक क. अभिधम्मपीटक ड. आगमग्रंथ

(१) फक्त अ व ब (२) फक्त ब व क (३) फक्त ब (४) वरीलपैकी सर्व

---

४६. भारतीय तत्त्वज्ञानातील काही तत्त्वज्ञाने (दर्शन) पुढे दिली आहेत. ***योग्य*** जोडया जुळवा.

| **दर्शन** | **तत्त्वज्ञ** |
|---|---|
| अ. न्याय | १. पतंजली |
| ब. वैशेषिक | २. कणाद |
| क. सांख्य | ३. गौतम |
| ड. योग | ४. कपील |

| | **अ** | **ब** | **क** | **ड** |
|---|---|---|---|---|
| (१) | ३ | ४ | २ | १ |
| (२) | २ | ३ | ४ | १ |
| (३) | १ | ४ | २ | ३ |
| (४) | ३ | २ | ४ | १ |

---

४७. **विधाने :** अ. गांधार शिल्पकलाशैलीवर ग्रीक आणि पर्शियन प्रभाव दिसतो.

ब. मथुरा शिल्पशैलीने भारतीय मुर्तीविज्ञानाचा पाया घातला.

क. मंदिर स्थापत्याच्या शैलीपैकी उत्तर भारतात 'नागर' शैली तर दक्षिण भारतात 'वेसर' शैली अशा दोन प्रमुख शैली मानल्या गेल्या.

वरीलपैकी ***काय बरोबर*** आहे?

(१) फक्त विधान ब बरोबर तर अ, क चूक आहे.

(२) फक्त विधान अ, ब बरोबर तर क चूक आहे.

(३) फक्त विधान अ बरोबर तर ब, क चूक आहे.

(४) वरील सर्व विधाने चूक आहेत.

---

४८. जगप्रसिद्ध वेरूळ येथील कैलास मंदिराबद्दल पुढील विधाने लक्षात घ्या व ***अयोग्य*** विधान/विधाने निवडा.

अ. हे मंदिर बदामी चालुक्य राजवटीमध्ये बांधले गेले.

ब. वेरूळ येथील १६ क्रमांकाचे लेणे म्हणजेच हे कैलास मंदिर होय.

क. कैलास मंदिर हे 'नागर' शैलीमध्ये बांधले गेलेले मंदिर आहे.

(१) फक्त अ व ब (२) फक्त ब व क (३) फक्त अ व क (४) वरीलपैकी सर्व

---

४९. तेलुगु भाषेमधील 'अमूक्तमाल्यदा' हा राजनितीविषयक ग्रंथ कोणी लिहीला?

(१) राजा रामराय (२) अमोघवर्ष (३) पुलकेशी (४) कृष्णदेवराय

५०. छत्रपती शिवाजी महाराजांना 'कुळवाडी–भूषण' असे प्रथम कोणी संबोधले?

(१) महात्मा फुले (२) लोकमान्य टिळक (३) शाहीर अनंत फंदी (४) महर्षी वि.रा. शिंदे

५१. आचार्य अत्रे यांनी जगन्नाथ शंकरशेठ यांना 'मुंबईचे अनभिषित्क सम्राट' ही पदवी दिली होती. पुढीलपैकी कोणत्या शैक्षणिक कार्यात/कार्यात जगन्नाथ शंकरशेठ यांचा सहभाग होता?

अ. द जगन्नाथ शंकरशेठ फर्स्ट ग्रेड अँग्लो हायस्कूल

ब. स्टुडंट लिटररी अॅण्ड सायंटिफीक सोसायटी

क. फीमेल हायस्कूल पुणे

ड. एलफिन्स्टन कॉलेज

(१) अ, क, ड (२) अ, ब, ड (३) अ, क (४) वरीलपैकी सर्व

५२. प्रार्थना समाजाने धर्मसुधारणेचे महत्त्वाचे कार्य केले.
पुढीलपैकी कोणत्या संस्था प्रार्थना समाजाशी निगडीत होत्या?

अ. सोशल सर्व्हिस लीग

ब. भारत सेवक समाज

क. डिप्रेस्ड क्लासेस मिशन

ड. अनाथ बालकाश्रम

(१) फक्त ब, क (२) फक्त अ, क, ड (३) फक्त अ, ब, क (४) वरीलपैकी सर्व

५३. महाराष्ट्रातील एका समाजसुधारकाचे पुढे वर्णन दिले आहे. त्यावरून ते समाजसुधारक कोण ते ओळखा.

अ. त्यांच्यावर जॉन मिल, ऑगस्ट कांट व हर्बर स्पेन्सर यांच्या विचारांचा प्रभाव होता.

ब. 'वाक्य मीमांसा', 'वाक्याचे पृथक्करण' इ. ग्रंथाचे त्यांनी लेखन केले.

क. देशी भाषा युनिव्हर्सिटीच्या अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात याव्यात यासाठी त्यांनी विद्यापीठांना अनेक अर्ज केले होते.

ड. उत्सव व यज्ञविधीमध्ये होणाऱ्या पशुहत्येविरूद्ध त्यांनी प्रहार केला.

(१) महात्मा फुले (२) गो.ग. आगरकर

(३) दादोबा पांडुरंग तर्खडकर (४) गोपाळ हरी देशमुख

५४. १८५७ च्या उठावावेळी महाराष्ट्रातील जनतेनेही ब्रिटिशांविरूद्ध उठाव केले. यासंदर्भात पुढे काही उठावकार व त्यांचे उठावाचे प्रदेश दिले आहेत. ***योग्य*** जोडी/जोडया ओळखा.

| **उठावकार** | **प्रदेश** |
|---|---|
| अ. भगवंतराव निलकंठराव | : जमखिंडी संस्थान |
| ब. आप्पासाहेब पटवर्धन | : नाशिकमधील पेठ |
| क. कजारसिंग | : खानदेश |
| ड. शंकरशहा | : सातपुडा |

(१) फक्त अ, ब (२) फक्त ब, क, ड (३) फक्त अ, क, ड (४) फक्त क, ड

५५. पुढीलपैकी कोणत्या पत्रिकेने/वृत्तपत्राने १८७९ मध्ये लिहिलेल्या लेखात ''देशप्रेमाने ओथंबलेला हिमालयासारख्या उत्तुंग महापुरूष'' असा वासुदेव बळवंत फडके यांचा गौरवपूर्ण उल्लेख केला होता?

(१) केसरी (२) मराठा (३) कलकत्ता जर्नल (४) अमृत बझार

५६. १८९२ च्या 'इंडियन कौन्सिल अॅक्ट' मध्ये पुढीलपैकी कोणती तरतूद होती.

अ. वार्षिक अंदाजपत्रकावर चर्चा करण्याचा अधिकार कायदेमंडळाला प्राप्त

ब. वार्षिक अंदाजपत्रकावर मतदान करण्याचा अधिकार कायदेमंडळाला प्राप्त

क. ऑस्ट्रेलिया, कॅनडा यांच्याप्रमाणे भारतालाही वसाहतीचे स्वराज्य देण्याचा विचार

ड. लोकहिताचे प्रश्न विचारण्याचा भारतीयांना अधिकार नाकारला गेला.

(१) फक्त अ, ब (२) फक्त ब, क, ड (३) फक्त अ (४) फक्त ब

www.spandancareers.org

५७. 'द इंडियन असोसिएशन' ची स्थापना पुढीलपैकी कोणी केली?
(१) दादाभाई नौरोजी (२) सुरेंद्रनाथ बॅनर्जी (३) शिरीषकुमार घोष (४) फिरोजशहा मेहता

५८. मुस्लीम समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा व अनिष्ट रूढी नष्ट व्हाव्यात म्हणून मुस्लीम धर्मसुधारणा चळवळी भारतात सुरू झाल्या. यासंदर्भात ***योग्य*** जोडया जुळवा.

| **सुधारक** | **कार्य** |
|---|---|
| अ. अब्दुल लतीफ | १. द मोहमेडन लिटररी सोसायटी |
| ब. सर सय्यद अहमदखान | २. मोहमेडन अँग्लो–ओरिएंटल कॉलेज |
| क. सय्यद आमिर अली | ३. सेंट्रल नॅशनल मोहमेडन असोसिएशन |
| ड. शाह वलिउल्लाह | ४. वहाबी चळवळ |

**अ ब क ड**
(१) १ २ ३ ४
(२) ४ १ २ ३
(३) ३ २ १ ४
(४) ४ ३ २ १

५९. २८ डिसेंबर १८८५ रोजी मुंबईतील गोकुळदास तेजपाल संस्कृत शाळेमध्ये 'भारतीय राष्ट्रीय सभे'ची (काँग्रेस) स्थापना झाली. त्यासाठी देशाच्या निरनिराळया भागांतून प्रतिनिधी आले होते. या अधिवेशनाला 'बॉम्बे प्रेसिडेन्सी' मधील किती प्रतिनिधी हजर होते?
(१) ३८ (२) ४५ (३) ६१ (४) ७२

६०. डॉ. ॲनी बेझंट यांच्याविषयीची पुढील विधाने विचारात घ्या व ***योग्य*** विधाने निवडा.
अ. डॉ. ॲनी बेझंट हया भारतीय राष्ट्रीय सभेच्या मद्रास (१९१४) व कलकत्ता (१९१७) या अधिवेशनांच्या अध्यक्ष बनल्या होत्या.
ब. डॉ. ॲनी बेझंट यांनी कलकत्ता येथे सेंट्रल हिंदू कॉलेजची स्थापना केली.
क. १९२० मध्ये असहकाराच्या प्रस्तावाला विरोध करून डॉ. ॲनी बेझंट यांनी काँग्रेसचा त्याग केला.
ड. १९०७ मध्ये डॉ. ॲनी बेझंट थिऑसॉफिकल सोसायटीच्या अध्यक्ष बनल्या.
(१) फक्त अ, ब, क (२) फक्त ब, क (३) फक्त क, ड (४) वरीलपैकी सर्व

६१. पुढील विधाने लक्षात घ्या व ***योग्य*** विधान/विधाने निवडा.
अ. १९०५ च्या राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष नामदार गोपाल कृष्ण गोखले होते.
ब. १९०५ च्या राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनामध्ये स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण ही चतु:सूत्री राष्ट्रीय सभेने स्विकारली.
क. १९०६ च्या राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनाचे अध्यक्ष दादाभाई नौरोजी होते.
(१) फक्त अ व ब (२) फक्त ब व क (३) फक्त अ व क (४) वरीलपैकी सर्व

६२. पुढे काही विधाने दिली आहेत त्या विधानांच्या आधारावरून संबंधित क्रांतिकारक ओळखा.
अ. त्यांनी 'युगांतर' या बंगाली साप्ताहिकाची स्थापना १९०६ मध्ये केली.
ब. त्यांनी 'भवानी मंदिर' ही पुस्तिका क्रांतिकार्याचे संघटन करण्यासाठी १९०५ मध्ये लिहीली.
क. १९०८ च्या अलिपूर बॉम्ब खटल्यामध्ये त्यांना दोषी ठरवले गेले होते.
(१) बारींद्रकुमार घोष (२) सचिंद्रनाथ सन्याल (३) तारकनाथ दास (४) ब्रम्हबांधव उपाध्याय

६३. सेनापती बापट यांच्याबद्दल ***योग्य*** विधान/विधाने निवडा.
अ. सेनापती बापट बर्लिन येथे बॉम्ब बनवण्याचे तंत्र शिकले.
ब. सेनापती बापट यांनी १९१४ नंतर सशस्त्र क्रांतीचा मार्ग सोडला व विधायक कार्याकडे वळले.
(१) फक्त अ (२) फक्त ब (३) अ व ब दोन्ही (४) एकही नाही

www.spandancareers.org

६४. गांधी–आयर्विन करार १९३१ (दिल्ली करार) यामध्ये पुढीलपैकी कोणती तरतूद ***नव्हती***?

अ. शांततापूर्वक निर्देशने करण्याचे भारतीयांना अधिकार

ब. राजकैद्यांची मुक्तता

क. भारताच्या प्रस्तावित राज्यघटनेमध्ये जबाबदार राज्यपद्धत स्विकारण्याची हमी

ड. सविनय कायदेभंगाची चळवळ बंद करणे.

(१) अ, ब (२) क, ड (३) फक्त क (४) वरीलपैकी एकही नाही

---

६५. ***योग्य*** जोडया जुळवा.

| **सम्राट** | **वास्तू निर्माण** |
|---|---|
| अ. चंद्रगुप्त द्वितीय | १. मेहरौलीचा विजयस्तंभ |
| ब. कृष्ण तृतीया | २. महाबलीपुरम स्थापना |
| क. नरसिंहवर्मन–प्रथम | ३. खजुराहो मंदिर |
| ड. यशोवर्मन | ४. रामेश्वरमध्ये विजयस्तंभ |

**अ ब क ड**

(१) १ ४ २ ३

(२) ४ १ २ ३

(३) २ ३ ४ १

(४) १ २ ३ ४

---

६६. १९४२ च्या क्रिप्स योजनेमध्ये पुढीलपैकी कोणत्या गोष्टी अंतर्भूत होत्या?

अ. पाकिस्तानची निर्मिती

ब. भारताला वसाहतीचे स्वातंत्र्य (Dominion Status)

क. भारताच्या राज्यघटनेसाठी युद्धानंतर घटना समिती (Constituent Assembly)

(१) फक्त अ, ब (२) फक्त ब, क (३) फक्त अ, क (४) वरील सर्व

---

६७. पुढे काही विधाने दिली आहेत. यापैकी ***योग्य*** विधाने निवडा.

अ. स्टूटगार्ड येथे १९०७ मध्ये भरलेल्या जागतिक समाजवादी परिषदेमध्ये मादाम कामा यांनी भारताचा ध्वज फडकवला होता.

ब. त्या ध्वजावर सात तारे व पाच कमळाची फुले होती.

क. त्या ध्वजावर ''वंदे मातरम्'' असा मजकूर लिहीलेला होता.

(१) फक्त अ, ब (२) फक्त ब, क (३) फक्त अ, क (४) वरील सर्व

---

६८. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनातील तीन कार्ये पुढे दिली आहेत. त्यांचा ***योग्य*** कालानुक्रम लावा.

अ. बहिष्कृत हितकारिणी सभा

ब. शेडयूल्ड कास्ट फेडरेशन

क. स्वतंत्र मजूर पक्ष

(१) अ, ब, क (२) ब, क, अ (३) अ, क, ब (४) ब, अ, क

---

६९. वसाहतवादी राज्यव्यवस्थेचे भारतीय अर्थव्यवस्थेवर पुढीलपैकी कोणते विपरीत परिणाम झाले?

अ. अनुउद्योगीकरण (Deindustrialization)

ब. शेतीचे व्यापारीकरण (Commercialization of Agriculture)

क. ग्रामीण समाजामध्ये सामान्य शेतकऱ्यांचे बनियांवर कर्जासाठी अवलंबित्व वाढले.

(१) फक्त अ, ब (२) फक्त ब, क (३) फक्त अ, क (४) अ, ब, क

---

७०. दिल्ली सुलतानशाहीमध्ये सिजदाह, पायबोज (पायाचे चुंबन घेणे) आणि नवरोज या गोष्टी कोणी सुरू केल्या?

(१) कुतुबुद्दिन ऐबक (२) अल्तमश (३) बल्बन (४) बहरामशहा

---

www.spandancareers.org

**७१.** पुढे काही विधाने दिली आहेत. या विधानांच्या आधारे संबंधित राष्ट्रीय चळवळीचे नेते कोण होते ते ओळखा.

अ. १९२० साली ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस (आयटक) ची स्थापना झाली व आयटकच्या पहिल्या अधिवेशनाचे अध्यक्ष होते.

ब. १९२० च्या राष्ट्रीय सभेच्या (काँग्रेसच्या) कोलकत्ता अधिवेशनाचे अध्यक्ष होते.

क. त्यांनी 'अनहॅप्पी इंडिया' हे पुस्तक लिहीले.

(१) लाला लजपतराय (२) श्रीपाद अमृत डांगे (३) आचार्य नरेंद्र दवे (४) महात्मा गांधी

---

**७२.** हडप्पाकालीन नद्या व त्यांच्या काठावर वसलेल्या शहरांच्या ***योग्य*** जोडया लावा.

| **शहर** | **नदी** |
|---|---|
| अ. हडप्पा | १. सिंधू नदी |
| ब. मोहोंजदडो | २. रावी नदी |
| क. लोथल | ३. भोगवा नदी |
| ड. कालीबंगन | ४. घग्गर नदी |

**अ ब क ड**

(१) १ २ ३ ४

(२) २ १ ३ ४

(३) २ १ ४ ३

(४) १ २ ४ ३

---

**७३.** १८५७ चा उठाव जरी अयशस्वी ठरला होता तरीही उठावाच्या परिणामस्वरूप ब्रिटिशांची भारतातील सर्वच धोरणे आमूलाग्र बदलली. पुढे काही विधाने दिली आहेत. १८५७ च्या उठावानंतर ब्रिटिशांनी भारतीय लष्करात पुढीलपैकी कोणते बदल केले ते ओळखा.

अ. भारतीय लष्करामध्ये युरोपियन सैनिकांची संख्या वाढविण्यात आली.

ब. बंगाल, बॉम्बे व मद्रासच्या लष्करामध्ये प्रती दोन भारतीय सैनिकांमागे एक युरोपियन सैनिक अशी रचना केली गेली.

क. जाती, समुदाय व प्रादेशिक आधारांवर लष्करामध्ये तुकडया पाडण्यात आल्या.

(१) फक्त अ, ब (२) फक्त ब, क (३) फक्त अ, क (४) वरील सर्व

---

**७४.** भारतीय राष्ट्रीय राजकारणातील काही महत्त्वाच्या घटना पुढे दिल्या आहेत, त्या ***योग्य*** कालानुक्रम लावा.

अ. दुसरी गोलमेज परिषद

ब. गांधी आयर्विन करार

क. जातीय निवाडा

ड. सविनय कायदेभंग चळवळ समाप्त

(१) अ, ब, क, ड (२) ब, क, अ, ड (३) अ, ब, क, ड (४) ब, अ, क, ड

---

**७५.** १९०७ सालचे रॉयल कमिशन पुढीलपैकी कोणत्या गोष्टीशी संबंधित होते?

(१) सत्तेच्या विकेंद्रीकरणाबाबत

(२) लष्करी सुधारणांबाबत

(३) मुस्लिमांना स्वतंत्र मतदारसंघ देणेबाबत

(४) स्वदेशी चळवळीला आळा घालण्याबाबत

---

**७६.** पुढे काही विधाने दिली आहेत. त्या विधानांपैकी ***योग्य*** विधान/विधाने निवडा.

अ. १९२१ ते १९३६ या काळात मुंबईच्या कापड उद्योगात पीछेहाट झाली.

ब. १९२६ ला स्थापन झालेल्या 'बॉम्बे टेक्स्टाईल लेबर युनियनचे' अध्यक्ष ना.म.जोशी होते

(१) फक्त अ (२) फक्त ब (३) अ, ब दोन्ही (४) एकही नाही

---

**७७.** पुढीलपैकी कोणत्या व्हाईसरॉयने''भारतीय राष्ट्रीय सभा (काँग्रेस) व राष्ट्रीयत्व यांचा शांतपणे मृत्यु घडून येईल.'' अशी भविष्यवाणी केली होती.

(१) लॉर्ड लिटन (२) लॉर्ड डफरीन (३) लॉर्ड एल्गिन (४) लॉर्ड कर्झन

---

www.spandancareers.org

७८. ***योग्य*** जोडया जुळवा.

| घराणे | संस्थापक |
|---|---|
| अ. सातवाहन | १. दंतीदुर्ग |
| ब. वाकाटक | २. विद्याधर जीमुतवाहन |
| क. राष्ट्रकुट | ३. सिमुक |
| ड. शिलाहार | ४. विंध्यशक्ती |

**अ ब क ड**

(१) ४ ३ १ २

(२) ३ ४ १ २

(३) ३ १ ४ २

(४) ४ ३ २ १

---

७९. भारतीय राष्ट्रीय सभा (काँग्रेस) बद्दल पुढे काही विधाने दिली आहेत. त्या विधानांचा विचार करून ***अयोग्य*** विधान/विधाने ठरवा.

अ. १८८५ ते १९४७ या कालखंडात मुंबई शहरात काँग्रेसची सर्वात जास्त अधिवेशने भरली.

ब. १८८५ ते १९४७ या कालखंडात काँग्रेसच्या अधिवेशनाचे अध्यक्षपद तीन वेळा महिला उमेदवारांकडे सोपवण्यात आले होते.

क. महात्मा गांधी १९२४ च्या अलाहाबाद अधिवेशनाचे अध्यक्ष होते.

ड. नारायण गणेश चंदावरकर हे राष्ट्रीय काँग्रेसचे पहिले मराठी भाषिक अध्यक्ष होते.

(१) फक्त अ, क (२) फक्त क (३) फक्त क, ड (४) फक्त अ, ड

---

८०. असहकार चळवळीमध्ये पुढीलपैकी कोणत्या कार्यक्रमांचा समावेश होता?

अ. परदेशी वस्तूंवर बहिष्कार टाकणे. ब. सरकारी नोकऱ्यांचा त्याग करणे.

क. अस्पृश्यता निवारण ड. दारूबंदीचा प्रसार करणे.

इ. राष्ट्रीय शिक्षण संस्थांची स्थापना करणे. ई. करबंदी

(१) अ, ब, ड, इ, ई (२) अ, ब, क, इ, ई (३) अ, ब, इ, ई (४) अ, ब, क, ड, इ

---

८१. पुढीलपैकी कोणते वृत्तपत्र किसन फागोजी बनसोडे यांनी सुरू केले?

अ. निराश्रित हिंदू नागरिक ब. मजूर पत्रिका क. चोखामेळा

(१) फक्त अ, ब (२) फक्त ब, क (३) फक्त अ, क (४) अ, ब, क

---

८२. पुढील विधाने विचारात घ्या.

अ. छत्रपती शाहू महाराज यांनी कायद्याने महार वतन पद्धत बंद केली.

ब. छत्रपती शाहू महाराज यांनी गुन्हेगार जातीची पोलीस ठाण्यावरील हजेरीची पद्धत बंद केली.

क. त्यांनी ब्राम्हणेतर पुरोहित तयार करण्यासाठी श्री. शिवाजी वैदिक स्कूलची स्थापना केली.

ड. सदाशिव लक्ष्मण पाटील हे श्री शिवाजी वैदिक स्कूलचे प्रमुख होते.

***योग्य*** विधाने निवडा.

(१) फक्त अ, ब (२) फक्त अ, ब, क (३) फक्त अ, क (४) वरील सर्व

---

८३. तत्त्वज्ञान व दार्शनिक विषयीच्या सहा शास्त्रामध्ये पुढीलपैकी कशाचा समावेश होत नाही?

(१) योग (२) न्याय (३) वेदान्त (४) उपनिषदे

---

८४. ***अयोग्य*** जोडी निवडा.

| महाजनपद | | राजधानी |
|---|---|---|
| (१) मल्ल | – | कुशीनगर |
| (२) वत्स | – | कौशाम्बी |
| (३) शूरसेन | – | मथुरा |
| (४) अवंती | – | चंपा |

---

www.spandancareers.org

८५. ***योग्य*** विधाने निवडा.

अ. ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना झाली त्यावेळी जहांगीर हा मुघल शासक राज्यकर्ता होता.

ब. अकबराने फतेहपूर सिक्री हे शहर बसविले.

क. अकबराने बुलंद दरवाजा उभारला.

ड. अकबराने आग्रा येथे इबादतखाना स्थापन केला.

(१) फक्त अ, ब (२) फक्त ब, क (३) फक्त अ, ब, ड (४) अ, ब, क, ड

---

८६. **स्मारक** **निर्माता**

| स्मारक | निर्माता |
|---|---|
| अ. चारमिनार | १. अब्दुला कुतुबशहा |
| ब. हिरा मशीद | २. शहाजहान |
| क. मोती मशीद | ३. मोहंमद कुली कुतुबशहा |
| ड. गोल घुमट | ४. अली आदिलशहा |

***योग्य*** जोडया लावा

**अ ब क ड**

(१) १ २ ३ ४

(२) ३ २ ४ १

(३) ४ ३ २ १

(४) ३ १ २ ४

---

८७. पुढील विधाने विचारात घ्या.

अ. ऋषभदेव हे जैन धर्मीयांचे पहिले तीर्थंकर मानले जातात.

ब. भद्रबाहूच्या नेतृत्वाखालील जैनांना श्वेतांबर म्हणून ओळखले जाते.

क. जैन धर्माच्या त्रिरत्नांमध्ये सम्यक दर्शन, सम्यक ज्ञान व सम्यक चिंतन याचा समावेश होतो.

***योग्य*** विधाने निवडा.

(१) फक्त अ (२) फक्त अ, ब (३) फक्त अ, क (४) फक्त ब, क

---

८८. भारतात ब्रिटिशांचा रेल्वे उभारणीचा हा हेतू होता.

अ. भारतातील ब्रिटिश साम्राज्यावाद्यांच्या आर्थिक, राजकीय व लष्करी हितसंबंध जपणे.

ब. देशांतर्गत मालवाहतूक करणे व माल निर्यात करणे.

क. भारतात इंग्रजी प्रशासन व्यवस्थेचा खर्च भागविणे.

ड. व्यापारासाठी भांडवल निर्माण करणे.

(१) फक्त अ (२) फक्त ब (३) फक्त क (४) फक्त अ आणि ब

---

८९. महात्मा गांधीजींनी पहिला राष्ट्रव्यापी 'सत्याग्रह' केला.....

(१) असहकार चळवळीच्या वेळी

(२) जालियनवाला बाग हत्याकांडावेळी

(३) खिलाफत चळवळीच्या वेळी

(४) रौलट ॲक्ट विरूद्ध

---

९०. वेदकालीन शासनव्यवस्थेच्या संरचनेतील काही घटक पुढे दिले आहेत. या घटकांचा त्यांच्या प्रशासकीय संरचनेनुसार योग्य चढता क्रम ओळखा.

(१) जनपद–जन–विश (२) विश–जनपद–जन (३) जन–विश–जनपद (४) विश–जन–जनपद

---

९१. स्वराज्य पक्षाचे ध्येय काय होते?

(१) परकीय वस्तुवर बहिष्कार टाकणे (२) भारतीय उद्योगांना पाठिंबा देणे

(३) ब्रिटिश साम्राज्यांतर्गत स्वराज्य (४) असहकार चळवळ सुरू करणे

---

www.spandancareers.org

९२. पुढील ओळीत कोणते वर्णन केले आहे?

अ. त्यांचा जन्म राधानगर गावात झाला.

ब. त्यांनी फारसी आणि अरबी भाषांचा पटना येथे अभ्यास केला होता.

क. सुफी कल्पनांचा त्याच्यावर परिणाम झाला होता.

ड. त्यांनी मूर्ती पुजे विरूद्ध पुस्तक लिहिले होते. त्यांच्या वडीलांनी त्यांना घराबाहेर काढले.

इ. ते तिबेटला गेले व परत आल्यावर त्यांनी संस्कृत व हिंदू पवित्र वाङ्‌मयाचा अभ्यास केला.

फ. त्यांनी तुहफत–उल–मुवाहिद्दीन हे पुस्तक फारसीत लिहिले.

(१) गदाधर चटोपाध्याय (२) ईश्वरचंद्र विद्यासागर (३) राजा राममोहन रॉय (४) केशवचंद्र सेन

---

९३. पुढे बौद्ध धर्माच्या परिषदा व त्या भरल्याची ठिकाणे दिली आहेत. ***योग्य*** जोडया लावा.

| **बौद्ध परिषद (समिती)** | **स्थळ** |
|---|---|
| अ. पहिली बौद्ध परिषद | १. राजगृह |
| ब. दुसरी बौद्ध परिषद | २. वैशाली |
| क. तिसरी बौद्ध परिषद | ३. पाटलीपूत्र |
| ड. चौथी बौद्ध परिषद | ४. काश्मीर |

**अ ब क ड**

(१) १ २ ३ ४

(२) १ २ ४ ३

(३) ३ १ २ ४

(४) ३ २ १ ४

---

९४. पुढे काही राजघराणे व त्यांनी स्थापत्यक्षेत्रामध्ये केलेले कार्य दिले आहे. यापैकी ***योग्य*** जोडया ओळखा.

अ. चालूक्य राजघराणे : महाबलीपूरम येथील रथमंदिरे

ब. पल्लव राजघराणे : बदामी, ऐहोळे, पट्टदकल येथील मंदिरे

क. राष्ट्रकूट राजघराणे : वेरूळचे कैलास मंदिर

ड. वाकाटक राजघराणे : अजिंठा येथील १६ क्रमांकांचे लेणे

(१) फक्त अ, ब, क (२) फक्त क, ड (३) फक्त ब, ड (४) वरीलपैकी सर्व

---

९५. 'ऑल इंडिया मुस्लीम लीग' विषयीची पुढील विधाने लक्षात घ्या व ***अयोग्य*** विधान निवडा.

(१) ऑल इंडिया मुस्लीम लीगची स्थापना ढाका येथे १९०६ मध्ये झाली.

(२) नवाब सलीम उल्ला हे लीगच्या संस्थापकांपैकी एक होते.

(३) लीगच्या लंडन शाखेचे नेते मोहसीन–उल्–मुल्क होते.

(४) लीगच्या उद्देशांमध्ये ब्रिटिशांशी एकनिष्ठ राहणे देखील होते.

---

९६. पुढीलपैकी कोणती शिफारस जेव्हीपी समितीने केली नाही?

(१) भाषावार प्रांतरचना काँग्रेसला तत्त्वत: मान्य.

(२) मराठी भाषिकांचा महाराष्ट्र मुंबईसह बनेल.

(३) केवळ वऱ्हाडचा वेगळा प्रांत होणार नाही.

(४) त्रावणकोर व कोचीन एकत्र येण्यास तयार असतील तर केवळ प्रांताची निर्मिती केली जाईल.

---

९७. पुढीलपैकी कोणती तरतूद नेहरू रिपोर्ट व जीना यांचा चौदा कलमी कार्यक्रम यामध्ये समान होती?

अ. भारत संघराज्यात्मक राज्यसंस्था असेल.

ब. अल्पसंख्याकांसाठी राखीव जागा असाव्यात.

क. सिंध प्रांत मुंबई प्रातांपासून स्वतंत्र असावा.

ड. पाकिस्तान हे नवीन राष्ट्र निर्माण करावे.

(१) वरील सर्व योग्य (२) अ, क (३) ब, क,ड (४) अ, ब

---

www.spandancareers.org

९८. ***योग्य*** कालानुक्रम निवडा.

अ. मीरत कट खटला

ब. पेशावर कट खटला

क. कानपूर कट खटला

(१) अ–ब–क (२) ब–क–अ (३) ब–अ–क (४) अ–क–ब

---

९९. सिंधू संस्कृतीतील उत्खननांचा कालखंडानुक्रम लावा

अ. मोहेंजोदडो ब. हडप्पा क. कालिंबगाँ ड. लोथल

(१) ब, अ, क, ड (२) अ, ब, क, ड (३) क, ब, अ, ड (४) ब, अ, ड, क

---

१००. ***योग्य*** जोडया जुळवा.

| **बादशहा** | **वर्णन/निर्णय** |
|---|---|
| अ. फिरोजशहा तुघलक | १. इब्न ए बतुता यास धोकादायक आदर्शवादी म्हणतो. |
| ब. अल्लाउद्दीन खिलजी | २. कायमस्वरूपी खडे सैन्य ठेवणारा पहिला सुलतान |
| क. महंमद बिन तुघलक | ३. जिझिया कर लावणारा पहिला सुलतान |
| ड. बल्बन | ४. सिजदा व पायबोस प्रथांची सुरूवात करणारा शासक |

**अ ब क ड**

(१) २ १ ३ ४

(२) २ ३ ४ १

(३) ४ २ १ ३

(४) ३ २ १ ४

---

**ALL THE BEST**

www.spandancareers.org

# SPANDAN CAREER INSTITUTE

THE WAY OF SUCCESS…

SPANDAN Career Institute The way of Success…

Mob. No. 9923262977

Date : 07/12/2019

राज्यसेवा (पूर्व) सराव परिक्षा - 2020

विषय : – इतिहास (History) [022]

ANSWER KEY

Total Que. : 100
Marks : 200
Time :2.00hrs

## FINAL ANSWER KEY- HISTORY [022] – [SET B]

| QUE | ANS | QUE | ANS | QUE | ANS | QUE | ANS |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 26 | 2 | 51 | 2 | 76 | 3 |
| 2 | 2 | 27 | 4 | 52 | 4 | 77 | 4 |
| 3 | 2 | 28 | 2 | 53 | 2 | 78 | 2 |
| 4 | 4 | 29 | 1 | 54 | 4 | 79 | 1 |
| 5 | 2 | 30 | 1 | 55 | 4 | 80 | 4 |
| 6 | 2 | 31 | 4 | 56 | 3 | 81 | 4 |
| 7 | 2 | 32 | 1 | 57 | 2 | 82 | 2 |
| 8 | 3 | 33 | 2 | 58 | 1 | 83 | 4 |
| 9 | 2 | 34 | 4 | 59 | 1 | 84 | 4 |
| 10 | 2 | 35 | 4 | 60 | 3 | 85 | 3 |
| 11 | 3 | 36 | 3 | 61 | 3 | 86 | 4 |
| 12 | 1 | 37 | 3 | 62 | 1 | 87 | 1 |
| 13 | 4 | 38 | 3 | 63 | 2 | 88 | 4 |
| 14 | 2 | 39 | 3 | 64 | 4 | 89 | 4 |
| 15 | 3 | 40 | 1 | 65 | 1 | 90 | 4 |
| 16 | 1 | 41 | 4 | 66 | 2 | 91 | 3 |
| 17 | 2 | 42 | 3 | 67 | 4 | 92 | 3 |
| 18 | 1 | 43 | 3 | 68 | 3 | 93 | 1 |
| 19 | 2 | 44 | 1 | 69 | 4 | 94 | 2 |
| 20 | 4 | 45 | 3 | 70 | 3 | 95 | 3 |
| 21 | 1 | 46 | 4 | 71 | 1 | 96 | 2 |
| 22 | 1 | 47 | 2 | 72 | 2 | 97 | 4 |
| 23 | 3 | 48 | 3 | 73 | 3 | 98 | 2 |
| 24 | 2 | 49 | 4 | 74 | 4 | 99 | 4 |
| 25 | 2 | 50 | 1 | 75 | 1 | 100 | 4 |

www.spandancareers.org

“Save Paper, Save Tiger”